आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

रविवार, दिनांक ०८ ऑक्टोबर २०२३

ठळक बातम्या

1. हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हाचं अनावरण, नागपुरच्या मेटनंस कमांड मुख्यालयातही वर्धापन दिन उत्साहात साजरा.
2. मदर डेअरी नागपूरच्या बुटीबोरीमध्ये दुधउत्पादन प्रकल्प साकारणार; विदर्भातील शेतकऱ्यांनी दुग्ध उत्पादन वाढवण्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच आवाहन.
3. नागपूर जिल्ह्यातील पिकाच्या नुकसानाची महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून पाहणी.

आणि

4. हॉंगझू आशियाई क्रीडास्पर्धांचा आज समारोप.

********

वायूदल वर्धापन दिन

भारतीय हवाई दलाच्या ९१व्या वर्धापन दिनाचा मुख्य सोहळा आज उत्तर प्रदेशात प्रयागराजच्या बमरौली तळावर झाला. हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर. चौधरी यांनी यानिमित्त आयोजित संचलनाची पाहणी केली. संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आणि इतर मान्यवरही यावेळी उपस्थित होते. यावेळी एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण केलं. यावेळी जुना बोधचिन्हांकीत ध्वज सन्मानपूर्वक उतरवून हवाई दलप्रमुखांकडे सुपूर्द केला गेला. आता हा जुना बोधचिन्हांकीत ध्वज हवाईदलाच्या वस्तुसंग्रहालयात ठेवला जाणार आहे. यंदाची हवाई दलाची संकल्पना “हवाई ताकद-सीमापार” अशी आहे. यापुढे युद्ध जिंकणं तसंच शांतता राखण्याच्या दृष्टीने

जगभरातल्या हवाई दलांच्या क्षमतांमध्ये होत असलेली वाढ आणि त्याच्या परिणामकारतेचे बारकावे आपण समजून घेण्याची गरज एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी यावेळी व्यक्त केली. मुंबईतही यानिमित्तानं आयोजित केलेल्या समारंभाला राज्यपाल रमेश बैस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नागपूरच्या वायुसेना नगरातील मेंटेनन्स कमांड हेडक्वार्टर येथे देखील भारतीय हवाई दलाचा 91वर्धापन दिनानिमित्त एअर मार्शल विभास पांडे, एअर ऑफिसर कमांडिंग इन चीफ (एओसी-इन-सी), यांनी शौर्य स्मारक' येथे पुष्पचक्र अर्पण केले. मेंटेनन्स कमांड तर्फे विविध उपक्रमांचे आयोजन ही करण्यात आले होते.

जीएसटी परिषद

जीएसटी आकारणी विरोधात अपील करण्याची मुदत येत्या ३१ जानेवारी पर्यंत वाढवण्यात आली आहे. वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५२व्या बैठकीत काल हा निर्णय घेण्यात आला. करदात्यांना यावर्षी मार्चअखेर कर अधिकाऱ्यांनी दिलेल्या मागणी आदेशावर येत्या ३१ जानेवारीपर्यंत अपील दाखल करण्याची सवलत काल देण्यात आली. जीएसटी कायद्यानुसार मागणी आदेशानंतर तीन महिन्याच्या आत करदात्याने अपील दाखल करायचे असते. ही मुदत वाढवल्यामुळं अनेक करदात्यांची सुविधा होणार आहे. तात्पुरत्या स्वरुपात मालमत्ता ताब्यात घेतली असेल तर एक वर्षानंतर ती मुक्त करण्याची तरतूदही कालच्या बैठकीत करण्यात आली. जीएसटी भरला नाही तर बँक खात्यांसह मालमत्ता तात्पुरती ताब्यात घेण्याचा अधिकार, कर अधिकाऱ्यांना दिलेला आहे.

गगनयान

भारतीय अंतराळ संशोधन संस्था- इस्रोनं गगनयानच्या चाचणीची तयारी सुरू केली आहे. २०२४ मध्ये अंतराळात मानवरहित यान तसंच मानवांना अंतराळात पाठवण्याच्या उद्देशानं यानातील व्यवस्थेची कार्यक्षमता तपासणं, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. चाचणीत बाह्य अवकाश

कक्षेत यानाला वायुमंडलातून पुन्हा पृथ्वीवर परत आणून बंगालच्या उपसागरात उतरवलं जाणार आहे. भारतीय नौदलाच्या कर्मचाऱ्यांनी यासाठी सराव सुरू केला असून या चाचणीच्या यशामुळं पहिल्या मानवरहित गगनयान मोहिमेचा टप्पा निश्चित होईल आणि शेवटी पृथ्वीच्या कमी कक्षेत बाह्य अवकाशात मानवयुक्त मोहिमेचा मार्ग निश्चित होण्यास मदत होणार आहे. यासाठी निवडलेले चार अंतराळवीर बंगळुरुच्या अंतराळ प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत.

## अँग्रोव्हिजन

शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून बाहेर निघायचे असेल तर त्यांनी दूध उत्पादनावर भर दिला पाहिजे. येत्या काळात दुधाची मागणी वाढणार असल्याने यादृष्टीने शेतकऱ्यांचे प्रबोधन आणि प्रशिक्षणही तेवढेच आवश्यक आहे,'असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. ॲग्रोव्हिजन'च्यावतीने आयोजित कार्यक्रमात ते नागपुरात बोलत होते. पश्चिम नागपूरच्या दाभा येथील पीडीकेव्ही ग्राऊंडवर येत्या २४ ते २७ नोव्हेंबर या कालावधीत ॲग्रोव्हिजन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. 'मदर डेअरीने बुटीबोरीमध्ये जागा घेतली आणि साडेचारशे कोटी रुपयांच्या प्रकल्पाचे लवकरच उद्घाटन होणार आहे. त्यामुळे भविष्यात विदर्भातूनच दुधाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. गरज पडली तर विदर्भाच्या बाहेरून दूध मागविण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने दुग्धोत्पादनावर मोठी कार्यशाळा यंदाच्या ॲग्रोव्हिजनमध्ये होणार आहे अशी माहिती गडकरी यांनी यावेळी दिली.

## नुकसान पाहणी

सप्टेंबर महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे तसेच पिकांवर आलेल्या रोगामुळे नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात पिकांचे प्रचंड नुकसान

झाले आहे. या नुकसानाची प्रत्यक्ष बांधावर जाऊन राज्याचे महसूल, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल पाहणी केली. नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी, काटोल, पावनवाडी, पारडसिंगा येथील नुकसानग्रस्त भागाचा दौरा त्यांनी केला. जिल्ह्यात प्रामुख्याने सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. प्रत्येक ठिकाणच्या शेतकऱ्यांनी सोयाबीनवर आलेल्या 'पिवळ्या मोझॉक व्हायरस' या रोगामुळे झालेल्या नुकसानाची माहिती महसूल मंत्र्यांना दिली. संत्रा व मोसंबी पिकांच्या वाणांचे संशोधन करण्यात यावे, अशी सूचना त्यांनी यावेळी केली. दरम्यान, आज दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी त्यांनी जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये जिल्ह्यातील नुकसानाचा आढावा घेतला.

आशियाई क्रीडा

चीनमध्ये आज हाँगझू आशियाई खेळांचा समारोप होत आहे. हॉकी संघाचा गोलरक्षक पी.आर. श्रीजेश भारतीय संघाचा ध्वजवाहक असेल. या खेळांमध्ये 28 सुवर्ण, 38 रौप्य आणि 41 कांस्य अशी एकूण 107 पदके जिंकून भारत चौथ्या स्थानावर आहे. काल खेळांच्या चौदाव्या दिवशी भारताने 6 सुवर्ण, 4 रौप्य आणि 2 कांस्य पदकांसह एकूण 12 पदके जिंकली. महिला कबड्डीमध्ये सुवर्णपदकाच्या रूपाने भारताला ऐतिहासिक 100वे पदक मिळाले. देशाला ॲथलेटिक्समध्ये सर्वाधिक २९ पदके मिळाली आहेत. भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्राने सुवर्णपदक तर किशोर कुमार जेनाने रौप्य पदक जिंकले. नेमबाजीत भारताने सात सुवर्णांसह २२ पदके जिंकली. भारतीय क्रिकेट आणि कबड्डी संघांनीही सुवर्णपदके पटकावली. पुरुष हॉकी मध्ये सुवर्णपदक जिंकून भारताने पॅरिस ऑलिम्पिकचा कोटा पक्का केला. महिला हॉकी संघाला कांस्यपदक मिळाले. याशिवाय निखत जरीन, प्रीती पवार आणि परवीन हुडा यांनी ऑलिम्पिक कोटा गाठला. अदिती अशोकने प्रथमच गोल्फ मध्ये रौप्य पदक जिंकले. दीपक पुनियाला पुरुषांच्या फ्रीस्टाइल कुस्तीत रौप्यपदक

मिळाले आहे. भारतीय पुरुष आणि महिला संघांनीही बुद्धिबळात रौप्यपदक जिंकले.

कार्यशाळा

गुंतवणूक वृध्दी, व्यवसाय सुलभीकरण, निर्यात व एक जिल्हा एक उत्पादन' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन नागपूरच्या वनामती सभागृहात उदया **9** ऑक्टोबर रोजी सकाळी **10** ते सायंकाळी **5** वाजेपर्यंत जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे. नागपूर जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, निर्यातदार, निर्यात संबंधित सर्व राज्य व केंद्र शासनाच्या यंत्रणांचे प्रतिनिधी, बँक व उद्योजक या कार्यशाळेला उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

युवा महोत्सव

१० ते १३ ऑक्टोबर दरम्यान अमरावती जिल्ह्यातील प्रा.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च,बडनेरा येथे यावर्षीचा युवा महोत्सव पार पडणार आहे.युवा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या कला प्रकाराचे उत्कृष्ट सादरीकरण करून भविष्यात नावलौकिक मिळवावा यासाठी युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असून विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, कलावंताच्या स्वागतासाठी सज्ज असल्याची माहिती, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

भारत-ऑस्ट्रेलिया क्रिकेट सामना

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज ऑस्ट्रेलियाविरुद्ध चेन्नईत सुरु आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी सुरु केली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या सर्वबाद १९९ धावा झाल्या होत्या.

हवामान

आगामी आठवडाभर विदर्भाच्या सर्व जिल्ह्यात वातावरण शुष्क राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे.

******